विक्रीकर निरीक्षक अराजपत्रित गट ब (मुख्य) परीक्षा – 2016

दि. 3 जून 2017

**प्रश्नपुस्तिका क्रमांक**
**BOOKLET No.**

202741

Code : C09

# प्रश्नपुस्तिका – I

**M**

## मराठी व इंग्रजी

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे**. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. पुढीलपैकी तालव्य अल्पप्राण असणारी व्यंजने कोणती ?

अ. क्   ब. च्

क. छ्   ड. ज्

(1) फक्त अ बरोबर   (2) फक्त ब आणि ड बरोबर

(3) फक्त क बरोबर   (4) फक्त ब आणि क बरोबर

---

2. क, च, त, ट, प या गटातील व्यंजनांना काय म्हणतात ?

(1) स्पर्श व्यंजने   (2) अंतस्थ व्यंजने

(3) उष्म व्यंजने   (4) मृदू व्यंजने

---

3. ज्या समासात दुसरे पद कृदन्त म्हणजे धातुसाधित असते. तो समास ओळखा.

(1) कर्मधारय समास   (2) उपपद तत्पुरुष समास

(3) विभक्ति तत्पुरुष समास   (4) नञ तत्पुरुष समास

---

4. वर्णमालेत या व्यंजनांचा समावेश केला जात नाही.

अ. श् आणि स्   ब. ह् आणि ळ्

क. क्ष् आणि ज्ञ्   ड. अं आणि अः

(1) अ बरोबर बाकी सर्व चूक   (2) क बरोबर बाकी सर्व चूक

(3) ड बरोबर बाकी सर्व चूक   (4) ब बरोबर बाकी सर्व चूक

---

5. क्रियापदातील ई – आख्यात, ऊ – आख्यात आणि ई – लाख्यात ह्यांचे मूळ संस्कृतांतील आख्यातप्रत्ययां – पासूनच आले असल्याने त्यांत ________ हा गुणधर्म आढळतो.

(1) फक्त पुल्लिंगांत बदल व इतर लिंगे समान

(2) फक्त स्त्रीलिंगात बदल व इतर लिंगे समान

(3) तिन्ही लिंगी समान

(4) तिन्ही लिंगात बदल संभवतो

---

6. पुढीलपैकी कोणते शब्दयोगी अव्यय व्यतिरेकवाचक शब्दयोगी अव्यय ***नाही*** ?

(1) विना   (2) खेरीज

(3) देखील   (4) निराळा

---

7. पुढील वाक्यातील क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा. मोठ्याने ओरडू नकोस.

(1) नामसाधित क्रियाविशेषण अव्यय

(2) विशेषणसाधित क्रियाविशेषण अव्यय

(3) धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय

(4) अव्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

---



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

8. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।' या वाक्यातील 'परी' या शब्दाने कोणते उभयान्वयी अव्यय सुचित होते ?
(1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय (2) न्युनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
(3) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय (4) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय

---

9. पुढील केवलप्रयोगी अव्ययांची चुकीची जोडी ओळखा.
(1) आश्चर्यकारक – अरेच्चा ! (2) मौनदर्शक – गप
(3) संबोधनदर्शक – अगे (4) प्रशंसादर्शक – बापरे

---

10. वाक्यात सर्वनामाचा वापर अशावेळी केला जातो.
अ. नामाची द्विरूक्ती टाळण्यासाठी ब. नामाच्या ऐवजी वापरण्यासाठी
क. कधीच केला जात नाही ड. भाषेला सौंदर्य प्राप्त करण्यासाठी
(1) अ आणि ब बरोबर बाकी सर्व चूक (2) अ आणि ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक (4) क आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

---

11. __________ हा प्रयोग इंग्रजीतून मराठीत आला आहे.
(1) नवीन कर्मणी प्रयोग (2) समापन कर्मणी प्रयोग
(3) शक्य कर्मणी प्रयोग (4) पुराण कर्मणी प्रयोग

---

12. चांगला मुलगा परीक्षेत पास होतो. तो मुलगा चांगला आहे.
अधोरेखित शब्दांचे विशेषण ओळखा.
अ. पहिल्या वाक्यात अधिविशेषण ब. दुसऱ्या वाक्यात विधी विशेषण
क. पहिल्या वाक्यात विधी विशेषण ड. दुसऱ्या वाक्यात अधि विशेषण
(1) अ आणि ड बरोबर (2) अ आणि ब बरोबर
(3) क आणि ड बरोबर (4) ब आणि ड बरोबर

---

13. 'तद्भवशब्द' ओळखा.
(1) क्लेश (2) किळस
(3) कलश (4) घास

---

14. 'मला गाडीत पहिले आसन मिळावे.' या वाक्याचा प्रकार कोणता ?
(1) आज्ञार्थी वाक्य (2) स्वार्थी वाक्य
(3) विध्यर्थी वाक्य (4) संकेतार्थी वाक्य

---

15. वाक्यातील क्रियापदांच्या रूपावरून नुसताच काळाचा बोध होत असेल तर त्यास कोणते वाक्य म्हणतात ?
(1) आज्ञार्थी वाक्य (2) विधानार्थी वाक्य
(3) स्वार्थी वाक्य (4) अकरणरूपी वाक्य

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

16. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

अ. प्रत्येक वाक्य हे संपूर्ण विधान असते.

ब. बोलणारा ज्याच्याविषयी बोलतो त्याला विधेय असे म्हणतात.

क. बोलणारा उद्देश्याविषयी जे बोलतो त्याला उद्देश्य असे म्हणतात.

(1) फक्त अ बरोबर

(2) फक्त ब आणि क बरोबर

(3) फक्त अ आणि क बरोबर

(4) फक्त अ आणि ब बरोबर

---

17. खालील योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | एकच एक उद्देश्य असून एकच एक क्रियापद | I. | क्रियाविशेषण वाक्य |
| ब. | एक मुख्य उद्देश्य व एक मुख्य विधेय व दोन अथवा अधिक क्रियापदे | II. | केवल वाक्य |
| क. | गौणवाक्य मिश्रवाक्यात विशेषणाचे कार्य करते | III. | मिश्रवाक्य |
| ड. | गौणवाक्यातील क्रियापद, विशेषण किंवा क्रियाविशेषण याबद्दल विशेष माहिती सांगणे | IV. | विशेषण वाक्य |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | III | II | I | IV |

---

18. 'जेव्हा तू जन्माला आलास तेव्हा भरपूर पाऊस पडत होता' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) स्थलवाचक क्रियाविशेषण वाक्य

(2) कालवाचक क्रियाविशेषण वाक्य

(3) रीतिवाचक क्रियाविशेषण वाक्य

(4) कार्यकारणदर्शक क्रियाविशेषण वाक्य

---

19. पुढीलपैकी मिश्रवाक्य कोणते ?

अ. तानाजी लढता लढता मेला.

ब. गुरुजी म्हणाले की प्रत्येकाने नियमितपणे शाळेत जावे.

क. आकाशात जेव्हा ढग जमतात, तेव्हा मोर नाचू लागतो.

ड. सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो किंवा मित्रांबरोबर फिरायला जातो.

(1) फक्त अ बरोबर

(2) फक्त ब आणि क बरोबर

(3) फक्त ब, क आणि ड बरोबर

(4) फक्त ड बरोबर



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

20. इकडे, मध्ये, रातोरात, आज इ. ही कोणत्या प्रकारची क्रियाविशेषण अव्यये आहेत ?

अ. स्थलवाचक विशेषण

ब. कालवाचक क्रियाविशेषण

क. संख्यावाचक क्रियाविशेषण

ड. रीतिवाचक क्रियाविशेषण

(1) अ आणि ब बरोबर

(2) अ आणि क बरोबर

(3) ब आणि ड बरोबर

(4) अ आणि ड बरोबर

---

21. रामाहून गोविंदा मोठा आहे.

अधोरेखित शब्दातील विभक्ती प्रत्ययाचा कारकार्थ खालीलपैकी कोणता आहे ?

(1) कर्ता (2) संप्रदान

(3) अपादान (4) करण

---

22. आम्ही गच्चीवर गेलो आणि चंद्र पाहू लागलो. या वाक्यातील 'आणि' हे कोणत्या प्रकारचे अव्यय आहे ?

(1) विकल्पबोध अव्यय (2) समुच्चयबोध अव्यय

(3) न्यूनत्वबोध अव्यय (4) शब्दयोगी अव्यय

---

23. पुढील विधानाला जी म्हण योग्य असेल असा पर्याय ओळखा.

काव्य गायनासाठी मित्राला नेल्यावर तो सारखा डुलक्या घेत होता. म्हणतात ना .....

(1) पालथ्या घड्यावर पाणी

(2) गाढवाला गुळाची चव काय

(3) पिकते तिथे विकत नाही

(4) दुष्काळात तेरावा महिना

---

24. 'खाई त्याला खवखवे'

या म्हणीच्या विरुद्ध अर्थाची म्हण ओळखा.

(1) चोराच्या मनात चांदणे

(2) कर नाही त्याला डर कशाला

(3) ज्याच्या हाती ससा तो पारधी

(4) गर्वाचे घर खाली

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**25.** वर्णमालेतील पुढीलपैकी कोणते वर्णाक्षर लुप्त होण्याच्या मार्गावर ***नाही*** ?

(1) ऋ (2) ञ

(3) लृ (4) ज्ञ

---

**26.** जोड्या लावलेल्या वाक्प्रचारांच्या जोडीतील चुकीचा अर्थ असलेली जोडी शोधा.

अ. हमरी तुमरीवर येणे – भांडण करू लागणे

ब. आंधळा कारभार – अंदाधुंदीचा कारभार

क. पोबारा करणे – बरोबरी करणे

ड. लष्कराच्या भाकरी भाजणे – निष्कारण उठाठेवी करणे

(1) अ बरोबर (2) क बरोबर

(3) ब बरोबर (4) ड बरोबर

---

**27.** पुढीलपैकी कोणता शब्द प्रत्ययसाधित ***नाही*** ?

(1) लेखक (2) पुकार

(3) झोपाळू (4) पथिक

---

**28.** इंग्रजीतील analysis वरून मराठीच्या व्याकरणात __________ आला आहे.

(1) वाक्यशास्त्रविचार (2) साहित्यविचार

(3) समीक्षाविचार (4) अलंकारविचार

---

**29.** ‘रखरख’ हा शब्द पुढीलपैकी कोणत्या गटातील आहे ?

(1) पूर्णाभ्यस्त (2) नादानुकरण वाचक

(3) अंशाभ्यस्त (4) प्रत्ययघटित

---

**30.** ‘हात तोकडे पडणे’ या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ सांगा.

(1) कृतीशील काम न करता फक्त कागदी पराक्रम गाजवणे

(2) मदत करण्यास क्षमता कमी पडणे

(3) पराभव करणे

(4) अशक्य गोष्ट करु पाहणे

---

**31.** पुढील चुकीचा संधीविग्रह कोणता, ते सांगा.

(1) गुरु + ओघ = गुर्वेघ (2) रमा + इच्छा = रमेच्छा

(3) स्व + ईर = स्वैर (4) प्रीति + अर्थ = प्रीत्यर्थ



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

32. पुढीलपैकी उभयविध नसलेले क्रियापद म्हणजे

(1) आठव (2) स्मर

(3) काप (4) जाग

33. पुढीलपैकी कोणत्या वाक्प्रचाराचा चुकीचा वाक्यात उपयोग केला आहे, तो ओळखा.

(1) नाक्यावरच्या पोरांनी माझी चांगलीच टोपी उडवली.

(2) विश्वासरावांनी शेवटी एकदाची गुळणी फोडली.

(3) मी परीक्षेत नापास झालो म्हणून बाबांनी मला डोक्यावर घेतले.

(4) प्रेक्षकांनी दुरदर्शनवरील मालिकांचे सध्या फारच देव्हारे माजवले आहेत.

34. पुढे काही म्हणींचे अर्थ दिले आहेत त्यापैकी चुकीची जोडी ओळखा.

(1) आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी – गरजू माणसांना मदत न करता गरज नसलेल्यांना मदत करणे

(2) उधार तेल खवट – उधार मिळालेल्या वस्तूत काहीतरी निश्चित कमतरता असते.

(3) आधी गुंतू नये व गुंतल्यावर कुंथु नये – कोणत्याही गोष्टीत अडकण्यापूर्वी विचार करावा अडकल्यावर विचार करू नये

(4) आधीच मर्कट, त्यात मद्य प्याला – दुसऱ्याच्या श्रमावर स्वत:चा फायदा उकळणे

35. षष्ठी विभक्तीचे एकवचनी प्रत्यय पुढीलपैकी कोणते आहेत ?

(1) ने, ए, ई, शी (2) ऊन, हून

(3) त, ई, आ (4) चा, ची, चे

36. शब्दयोगी अव्यये पुढीलपैकी कोणत्या शब्दजातीला जोडून येतात ?

(1) नाम (2) क्रियापदे

(3) क्रियाविशेषणे (4) वरील सर्व पर्याय बरोबर

37. 'लांबचा प्रवास बसने करावा की कारने' या वाक्यातील 'की' हे अव्यय पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय (2) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय

(3) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय (4) उभयान्वयी अव्यय

38. भाषाविषयक कौशल्यांच्या साधारणपणे किती पायऱ्या आहेत ?

(1) पाच (2) तीन

(3) चार (4) दोन

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**पुढील उतारावाचून त्यावर आधारित 39 ते 43 प्रश्नांची उत्तरे द्या :**

वाङ्मयीन अथवा सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या मुलाखती हा अलीकडे सर्वच माध्यमांत लोकप्रिय झालेला प्रकार आहे. चित्रपट पुरवण्या अथवा वाङ्मयीन नियतकालिके यातून हे अनुभवाला येते. ज्येष्ठ नामवंत नाट्य समीक्षक प्रा. माधव वझे यांनी नाट्य क्षेत्रातील नामवंतांच्या काही मुलाखती घेतल्या, त्या 'साप्ताहिक सकाळ'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या होत्या. प्रा. वसंतराव कानेटकर, डॉ. श्रीराम लागू, डॉ. विजया मेहता, नसरुद्दीन शहा, भक्ती बर्वे, नीना कुलकर्णी यांच्या मुलाखती आजही स्मरणात आहेत. या मुलाखती वाचताना लेखकाने एकूण स्वीकारलेला मुलाखतीचा ढाचा आपल्या लक्षात येतो. कलावंताचे एकूण चरित्र, त्याच्यासंबंधीची काही Impression आणि मग थेट प्रश्नोत्तरे असे या मुलाखतींचे एकंदर स्वरूप असल्याचे लक्षात येते. वझे हे रूढ अर्थाने पत्रकार-मुलाखतकार नाहीत. ते तज्ञ, जाणकार मुलाखतकार आहेत. त्यामुळे त्यांच्या मुलाखती वाचताना आपल्याला अनेक नवे संदर्भ आणि माहिती मिळत असते. नाटकाशी संबंधित अनेक नवे घटक आणि तत्सम माहितीही आपल्या आकलनात भर टाकते. ह्या कलावंताचे, नाटकाचे वेगळेपण आपल्याला अधिक जाणतेपणाने लक्षात येते. या मुलाखती प्रदीर्घ असतात. त्यामुळे तपशीलवार आणि अभ्यासपूर्ण अशा त्यांच्या स्वरूपाने आपण एक वेगळाच अनुभव घेत आहोत; असे जाणवते. या मुलाखतींनी आपण संबंधित व्यक्तीच्या एकूणच जीवनाशी रसिक-वाचक म्हणून नकळतपणे जोडले जातो.

काही व्यक्ती मुलाखतीसाठी नाखूष असतात. त्यांच्या मुलाखती घेणे हे दिव्यच असते. पण पत्रकारांना ही आव्हाने स्वीकारावी लागतात. विश्राम बेडेकर, जी. ए. कुलकर्णी आणि ग्रेस ही मराठी साहित्य विश्वातील अशी त्रिमूर्ती आहेत की, ज्यांच्या फार थोड्या मुलाखती वाचायला मिळतात. विश्राम बेडेकर हे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हा प्रस्तुत लेखकाला एक पत्रकार आणि दैनिकाचा प्रतिनिधी म्हणून मुलाखत घ्यावयाची होती. त्या दरम्यान श्री. बेडेकरांना 'एक झाड दोन पक्षी' या त्यांच्या आत्मचरित्रपर ग्रंथाबद्दल साहित्य अकादमीचा पुरस्कारही लाभला होता. पण ही मुलाखत घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या एका तज्ज्ञ व्यक्तीकरवी ही मलाखत घेण्याचे त्या दैनिकाने निश्चित केले आणि ही मुलाखत प्रसिद्ध झाली. जी.ए. कुलकर्णी हे मराठीतील फार मोठे कथाकार. त्यांच्या कथांनी मराठी साहित्याला उंची, खोली लाभली आहे. त्यांच्या कथांची इंग्रजीत भाषांतरे झाली असती तर मराठीला नोबेल पारितोषिक मिळाले असते असे ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी वारंवार म्हटले आहे. मात्र या जीएंची मुलाखत त्यांच्या प्रसिद्धी पराङ्मुखतेमुळे कोणालाही घेता आली नाही.



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

या त्रिमूर्तींमधले तिसरे मोठे कवी म्हणजे ग्रेस. त्यांच्या कवितांनी मराठी रसिक वेडे झाले आहेत. ग्रेसबद्दल एक वेगळेच कुतूहल मराठी जनमानसात आहे. मराठी वाङ्मयाचे अनेक जाणकार वाचक ग्रेसचे विलक्षण चाहते आहेत. विदर्भात नागपूर स्थित असणारे कवी ग्रेस यांची विलक्षण सुंदर विस्तृत अशी मुलाखत ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी घेतली होती. नागपूरहून त्या काळी प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'तरुण भारत' च्या रविवार अंकात ती प्रसिद्ध झाली होती. वाङ्मयाच्या अभ्यासकांना आणि ग्रेस यांच्या चाहत्यांना त्या मुलाखतीने ग्रेस यांच्या बरेच जवळ नेले, हे येथे आवर्जून नोंदवावे लागेल. ग्रेसची जीवनदृष्टी, त्यांचा पूर्व काळ, त्यांचा व्यासंग या साऱ्यांचे सम्यक दर्शन त्या मुलाखतीमधून घडले.

मुलाखतींमधून एखादा माणूस किंवा एखादा विषय शोधणे आणि त्याची सुसंगत मांडणी करणे हेही एक वेगळे लेखन आहे. त्यांचे येथे एक बोलके उदाहरण देतो. यशवंतराव चव्हाण हे भारतातील थोर नेते. महाराष्ट्राचे ते पहिले मुख्यमंत्री होते. भारताचे पहिले पंतप्रधान कै. पंडित नेहरू यांचे ते निकटचे सहकारी होते. यशवंतराव चव्हाण एक व्यासंगी, कल्पक आणि चिकित्सक वाचक होते. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गोफ गुंफण्याचे काम विविध मुलाखतींच्या आधारे 'कृष्णाकाठचा माणूस' या पुस्तकातून कवी अरुण शेवते यांनी केले आहे. शरद पवार, वसंतदादा पाटील, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आदींच्या मुलाखती या पुस्तकात त्यांनी घेतल्या आहेत. यशवंतराव चव्हाण ह्यांचे बहुमिती व्यक्तिमत्त्व शोधण्याचा एक वेगळा प्रयत्न या माध्यमातून शेवते यांनी केला आहे. या मुलाखती वाचण्यासारख्या आहेत. महाराष्ट्रातल्या राजकारणातले, सांस्कृतिक क्षेत्रांतले अनेक संदर्भ यातून समजतात आणि यशवंतराव चव्हाण ह्यांच्याबरोबरच महाराष्ट्राच्या एकूण स्वभावाचीही आपल्याला ओळख होते. याच्याच जोडीने वसंतदादा पाटील, शरद पवार ही ज्येष्ठ नेते मंडळी यशवंतराव चव्हाण ह्यांच्याबद्दल किती आत्मीयता, आदर भावना बाळगणारी होती, हेही जाणवत राहते.

39. प्रा. माधव वझे यांच्या मुलाखतींचे वेगळेपण काय आहे ?
(1) रूढ अर्थाने मुलाखतकार
(2) मुलाखतींचे तपशीलवार, अभ्यासपूर्ण व नाविन्यपूर्ण रूप
(3) प्रदीर्घ मुलाखती
(4) थेट प्रश्नोत्तरे

40. विश्राम बेडेकर, कवी ग्रेस, जी.ए. कुलकर्णी यांच्या कोणत्या गुणांमुळे त्यांच्या फारशा मुलाखती सापडत नाहीत ?
(1) लाजरेपणा
(2) भित्रेपणा
(3) प्रसिद्धी पराङ्मुखता
(4) प्रसिद्धी हव्यास

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

41. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी कवी ग्रेस यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून काय निष्पन्न झाले ? योग्य पर्याय शोधा.

अ. कवी ग्रेस यांची जीवनदृष्टी

ब. त्यांचा भूतकाल

क. त्यांचा विद्याव्यासंग

ड. त्यांचा संघर्ष

(1) फक्त अ बरोबर

(2) फक्त अ, ब आणि क बरोबर

(3) फक्त क, ड आणि ब बरोबर

(4) फक्त अ, ब आणि ड बरोबर

---

42. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

अ. मुलाखतींमधून एखादा माणूस किंवा एखादा विषय शोधणे व त्याची सूसंगत मांडणी करणे गरजेचे आहे.

ब. मुलाखती नाविन्यपूर्ण, तपशीलवार व अभ्यासपूर्ण असाव्या.

क. ज्या व्यक्ति मुलाखतींसाठी नाखुष असतात त्यांच्या मुलाखती घेणे सर्वथा अशक्य असते.

(1) फक्त अ आणि ब बरोबर

(2) फक्त ब आणि क बरोबर

(3) तिन्ही विधाने बरोबर

(4) तिन्ही विधाने चूक

---

43. 'कृष्णाकाठचा माणूस' या पुस्तकाने काय साध्य केले आहे ?

अ. यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तित्वाची ओळख.

ब. राजकारण व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध संदर्भ शोधण्याचा प्रयत्न.

क. आपापल्या क्षेत्रातील गाजलेल्या व्यक्तिंचे बहुमित व्यक्तिमत्व शोधण्याचा एक वेगळा प्रयत्न.

ड. साहित्य क्षेत्रातील मुलाखतींसाठी नाखुष मंडळींना बोलते करण्याचा एक आगळा प्रयत्न.

(1) फक्त अ आणि ड बरोबर

(2) फक्त ब, क आणि ड बरोबर

(3) सर्व पर्याय बरोबर

(4) फक्त अ, ब आणि क बरोबर



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**44.** अनघ या अर्थाचा पुढीलपैकी शब्द कोणता ?
(1) ढग (2) मुलगा (3) निष्पाप (4) सुंदर

**45.** 'दास' या अर्थाचा पुढीलपैकी कोणता शब्द *नाही* ?
(1) किंकर (2) भृत्य
(3) अनुचर (4) अधम

**46.** समोरील दृश्य पाहून शिरीषला वाटले की ________ दुभंगून पोटात घेईल तर बरे !
रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.
(1) वसुधा (2) धरणी
(3) धरित्री (4) वसुंधरा

**47.** वाग्विहार या शब्दाची योग्य वर्णरचना कोणती ?
(1) व् + आ + ई + ह् + आ + र् + अ
(2) व् + आ + ग् + व् + इ + ह + आ + र् + अ
(3) व् + आ + ङ् + न् + व + ई + ह + आ + र् + अ
(4) व् + आ + क् + व् + ई + ह् + आ + र् + अ

**48.** 'नेआण' या शब्दाचा समास कोणता ?
(1) द्वंद्व समास (2) बहुव्रीहि समास
(3) समाहार समास (4) इतरेतर द्वंद्व समास

**49.** मन:पटल या विसर्गसंधीची फोड ________ .
(1) मन + पटल (2) मनस् + पटल
(3) मनो + पटल (4) मन: + पटल

**50.** शिवाजी महाराज ही एक विभूती होती. 'विभूती' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतो ?
अ. तत्सम शब्द ब. तद्भव शब्द
क. देशी शब्द ड. संस्कृत शब्द
(1) अ आणि क बरोबर (2) ब आणि क बरोबर
(3) अ आणि ड बरोबर (4) कोणताही नाही

**51.** 'सुदर्शन' या दिलेल्या शब्दाचा प्रकार कोणता ? हे दिलेल्या पर्यायातून निवडा.
(1) प्रत्यय घटित शब्द (2) पूर्णाभ्यस्त शब्द
(3) उपसर्ग घटित शब्द (4) अंशाभ्यस्त शब्द

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**52.** पुढीलपैकी चुकीची जोडी कोणती, ते ओळखा.

(1) गंज – लोखंडावर चढणारा (2) गंज – बाजार

(3) गंज – ढीग, रास (4) गंज – लोखंडी सळई

---

**53.** प्रादुर्भूत होणे म्हणजे काय ?

(1) दिसू लागणे (2) जबरदस्ती करणे

(3) वरचढ ठरणे (4) अंदाज येणे

---

**54.** 'खाई त्याला खवखवे' या म्हणीच्या विरुद्ध अर्थाची म्हण कोणती ?

(1) उंदराला मांजर साक्ष

(2) कर नाही त्याला डर कसली ?

(3) दात कोरून पोट करत नाही

(4) बुडत्याचा पाय खोलात

---

**55.** पुढीलपैकी कोणता शब्द अंशाभ्यस्त शब्द ***नाही*** ?

(1) लाडीगोडी (2) बोलणेचालणे

(3) इकडेतिकडे (4) कटकट

---

**56.** पुढीलपैकी कोणता शब्द अरबी प्रत्ययसाधीत शब्द ***नाही*** ?

(1) नखरेबाज (2) गुलजार

(3) माती (4) हत्यारबंद

---

**57.** 'जरा' म्हणजे

(1) म्हातारपण (2) तरुण

(3) विधवा (4) पती

---

**58.** द्वंद्व समासाचा कोणता प्रकार मराठीत ***नाही*** ?

(1) इतरेतर द्वंद्व (2) एकशेष द्वंद्व

(3) समाहार द्वंद्व (4) वैकल्पिक द्वंद्व

---

**59.** विसर्ग हा एक ________ वर्ण आहे.

(1) तालव्य (2) ओष्ठ्य

(3) कंठ्य (4) दंततालव्य

---

**60.** पुढीलपैकी कोणता शब्द सिद्ध या गटात मोडत ***नाही*** ?

(1) जय (2) हार

(3) गत (4) यशस्वी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK** P.T.O.

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

61. Select the correct sentences.

a. Will you borrow me your pen ?

b. I borrowed a pen from my brother.

c. I lent a pen from my brother.

d. Will you lend me your pen ?

(1) Only a and b are correct

(2) Only c and d are correct

(3) Only a and c are correct

(4) Only b and d are correct

---

62. a. The descent of the hill is very dangerous.

b. She always wears descent clothes.

Identify the correct sentence/s.

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) Neither a nor b

---

63. Choose the correct option to fill in the blank.

She felt sorry for her aunt __________ .

(1) why she read her letter

(2) when she read her letter

(3) which she read her letter

(4) then she read her letter

---

64. Choose the correct use of articles.

a. A ass

b. An unicorn

c. The British Isles

(1) Only a

(2) Only a and b

(3) a, b and c

(4) Only c

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**65.** a. Ghosts are not corporal beings.

b. In our schools the children are not given any corporal punishment.

Identify the correct sentence/s.

(1) Only a (2) Only b

(3) Both a and b (4) Neither a nor b

---

**66.** Select the correct alternative with the words spelt correctly.

(1) embrass, accomodation, sizeable, accesary

(2) embrass, accomodation, sizeable, accessory

(3) embarass, accommodation, sizeable accessary

(4) embarrass, accommodation, sizable, accessary

---

**67.** The money was spent without parliamentary <u>authority</u>.

Select the alternative that could best replace the underlined word.

(1) control (2) influence

(3) consent (4) charge

---

**68.** Choose the correct sentences.

a. Here is the information for which you asked for.

b. Here is the information for which you asked.

c. Here is the information you asked for.

(1) Only a and b (2) Only a and c

(3) Only b and c (4) a, b and c

---

**69.** Choose the correct option to fill in the blank in the given sentence.

The matter is ________ at the next meeting of the committee.

(1) having discussed (2) being discussed

(3) to discuss (4) been discussed

---

**70.** Choose the correct spelling.

(1) Buracracy (2) Bureaucracy

(3) Buroacracy (4) Bureucracy

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK P.T.O.

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

71. Choose the correct sentence.

(1) The mankind should love the nature.
(2) Mankind should love the nature.
(3) The mankind should love nature.
(4) Mankind should love nature.

---

72. a. Have you been there, you would have won the prize.

b. Though I had completed all my assignments, I didn't get credit for them.

Identify the correct sentence/s.

(1) Only a
(2) Only b
(3) Both a and b
(4) Neither a nor b

---

73. Choose the correct sentence/s.

a. Did you ask somebody to come ?

b. One must not praise oneself.

c. One cannot be too careful of his good name.

(1) Only a
(2) Only b
(3) Only a and b
(4) a, b and c

---

74. Hungry dogs bark throughout the day.

Identify the correct sentence/s in which the underlined term is used as a clause.

a. Dogs without food bark throughout the day.

b. Dogs that have no food bark throughout the day.

(1) Only a
(2) Only b
(3) Both a and b
(4) Neither a nor b

---

75. Choose the option which correctly describes the function of the clauses printed in capitals.

a. We posted guards WHERE THE MAN HAD BEEN SEEN.

b. We posted guards at the entrance WHERE THE MAN HAD BEEN SEEN.

(1) Adverb, adverb
(2) Adjective, adjective
(3) Adverb, adjective
(4) Adjective, adverb

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**76.** Select the correct positive degree.

Iron is the most useful of all metals.

(1) Iron is as useful as other metals.

(2) Very few metals are as useful as Iron.

(3) No other metal is as useful as Iron.

(4) Iron is more useful than any other metals.

---

**77.** Identify the word closest in meaning to the word in capital in the following sentence :

The scots are famous for their PAWKY humour.

(1) Resembling Pakistani culture

(2) Amusing in an odd way

(3) Soothing in an odd way

(4) Scolding abruptly

---

**78.** 'She hardly ever smiles.'

Which one of the following sentences is a correct version of sentence with a tag question corresponding to the sentence above ?

(1) She hardly ever smiles, doesn't she ?

(2) She hardly ever smiles, does she ?

(3) She hardly ever smiles, is she ?

(4) She hardly ever smiles, isn't she ?

---

**79.** Match the following in terms of their meanings :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Savvy | I. | Interest |
| b. | Savour | II. | Separation |
| c. | Schism | III. | Violent wind |
| d. | Tornado | IV. | Practical knowledge |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | I | III | II |
| (2) | I | IV | III | II |
| (3) | I | IV | II | III |
| (4) | IV | I | II | III |



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**Read the following passage and answer the questions from 80 to 84 :**

The defects of the ordinary system of mass education are many and they may be briefly summarised as follows: First, the system of teaching in large classes is rigid. No allowance is made for the peculiar mental constitution of the individual child who is sacrificed to the average of the classes. The class and the fixed curriculum are like the bed of Procrustes in the story: those who are too large for the bed are cut down until they fit and those who are too short are stretched. The child who is quick and talented in one subject but not in others is compelled under the current system of mass education to sacrifice his talents to his deficiencies. Thus, a child may have a great talent for English and none for arithmetic. He may have a real feeling for literature, a gift for composition but when you ask him what percentage of a floor 18·7 feet long by 53/16 metres wide remains uncovered when you have spent three pounds eleven shillings and seven pence on linoleum costing 179·06 dollars per acre, he finds it difficult or impossible to reply. He must therefore remain in a low class where they read nothing but baby books and concentrate on spelling and grammar until such time as he can solve this interesting and instructive problem.

Second, under the present system of mass education by classes, too much stress is laid on teaching and too little on active learning. The child is not encouraged to discover things on his own account. He learns to rely on outside help, not on his own powers, thus losing intellectual independence and all capacity to judge for himself. Moreover, the lessons in class leave him mainly unoccupied and therefore bored. He has to be forced into learning what does not interest him and the information acquired mechanically and reluctantly, but by dint of brute repetition, is rapidly forgotten.

Third, the child being bored and unoccupied, is also mischievous. A strict external discipline becomes necessary unless there is to be confusion. The child learns to obey, not to control himself. He loses moral as well as intellectual independence.

---

**80.** The second defect of mass education system is that

a. It sacrifices a child's talents to his deficiencies.

b. It relies on an external discipline system.

c. It promotes very little active learning.

d. It makes a child mischievous.

(1) Only a (2) Only b

(3) Only d (4) Only c

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

81. The humorous problem referred to in the passage is

a. Concentrating both on spelling and grammar.
b. Balancing between the class and the fixed curriculum.
c. Solving an arithmetic problem involving an odd variety of items.
d. Developing child's peculiar mental constitution.

(1) Only a (2) Only b
(3) Only d (4) Only c

---

82. The child in the mass education system gets mischievous because

a. He is asked to solve English as well as arithmetic problems.
b. He is forced to listen to the story of the bed of Procrustes.
c. The lessons in the class make him bored and unoccupied.
d. His feeling for literature and gift for composition are neglected.

(1) Only c (2) Only a
(3) Only b (4) Only d

---

83. The system of mass education neglects a psychological truth that

a. The beds of Procrustes are not always properly cut.
b. A child who is talented in one subject is not so in other subjects.
c. All children need to be bored in order to be mischievous.
d. Only baby books help a child concentrate on spelling and grammar.

(1) Only a (2) Only b
(3) Only c (4) Only d

---

84. The overall attitude of the author towards the mass education system is

a. humorous b. cynical
c. supportive d. optimistic

(1) Only a (2) Only c
(3) Only b (4) Both c and d

---



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

85. Choose the correct alternative to make a meaningful passive sentence.

Our first day at the Dak bungalow _______ (spend) mainly in unpacking.

(1) had spend
(2) was spend
(3) was spent
(4) spends

86. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | A finger in every pie | I. | To start working hard |
| b. | Have one's finger in the till | II. | To hope |
| c. | Pull one's finger out | III. | To steal money from the place where one works |
| d. | Keep one's fingers crossed | IV. | To have interest in everything |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | I | II |
| (2) | IV | III | I | II |
| (3) | I | II | III | IV |
| (4) | IV | III | II | I |

87. He broke down in the middle of his speech. Here 'to break down' means

a. to stop suddenly
b. to quarrel with
c. to exit by force
d. to fail

(1) Only b is correct
(2) Only d is correct
(3) Only c is correct
(4) Only a is correct

88. He is leaving India for good.

Here 'for good' means

a. permanently
b. happily
c. with grief
d. temporarily

(1) Only b is correct
(2) Only a is correct
(3) Only d is correct
(4) Only c is correct

कच्च्या-कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**89.** Choose the correct alternative to complete the sentence.

He was __________ to prove the correctness of the press report.

(1) called on (2) called upon

(3) called at (4) called off

---

**90.** Choose the class of the underlined words.

After he had drunk (I) the whisky, the drunk (II) was very drunk (III) indeed.

a. Adjective b. Noun

c. Verb d. Adverb

| | I | II | III |
|---|---|---|---|
| (1) | a | d | c |
| (2) | b | c | d |
| (3) | c | b | a |
| (4) | d | a | b |

---

**91.** Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Back away | I. | To be near to |
| b. | Back down | II. | To fail to fulfil a promise |
| c. | Back out | III. | To accept defeat |
| d. | Back onto | IV. | Move away |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | II | I |
| (2) | III | IV | I | II |
| (3) | IV | III | I | II |
| (4) | IV | III | II | I |

---

**92.** Which of the following prefixes are used in formation of antonyms ?

a. in ______ b. dis ______

c. a ______ d. pan ______

(1) Only a, b and c (2) Only b, c and d

(3) Only a, c and d (4) a, b, c and d



www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**93.** Choose the correct sentences.

a. He was so changed in appearance that I hardly knew him.

b. This typewriter is as good as new; it has hard been used.

c. Every morning this week she has arrived late.

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a and c (4) a, b and c

---

**94.** He is very rigid in his attitude. If he wants his work done, he ought to be ________ and ready to make adjustment.

Select the correct alternative which is the appropriate antonym of the underlined word and complete the sentence.

(1) joyful (2) clam

(3) modest (4) flexible

---

**95.** Internet is the most useful device to disseminate information.

Select the correct alternative that indicates the correct meaning of the word underlined.

(1) collect

(2) record

(3) save

(4) spread

---

**96.** Choose the correct option to fill in the blanks in the given sentences.

a. When ________ Lalita take her teaching degree ?

b. Which school ________ she go to first ?

(1) does, did

(2) did, did

(3) did, does

(4) has, did

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**97.** Choose the sentence/s containing correct adverb/s.

a. Balraj's mother serves always an excellent dinner.

b. Do you go often fishing ?

c. He is grumbling always about his ill-luck.

d. I seldom eat more than this at lunch.

(1) Only a and d
(2) Only d
(3) Only a, b and c
(4) Only a, c and d

---

**98.** Choose the correct word to fill in the blank in the following sentence :

He is ________ than I expected.

(1) latter
(2) last
(3) later
(4) lastly

---

**99.** Select the correct meaning of the underlined word.

The idea has distinct possibilities.

(1) chances
(2) odds
(3) alternatives
(4) prospects

---

**100.** Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Boast | I. | At |
| b. | Arrive | II. | In |
| c. | Interested | III. | From |
| d. | Die | IV. | Of |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | I | II | III |
| (2) | IV | II | I | III |
| (3) | IV | III | II | I |
| (4) | III | IV | II | I |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

# सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतःबरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi